"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - कर्मवीर"

रयत शिक्षण संस्थेचे

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

## Accredited by NAAC with "A" Grade

(An ISO 9000 : 2001 Certified College)

"तू वंशाचा दिवा
आमचे जगणेच बेचव रे
वेडया बहिणीची नवी मागणी
भाऊराया वाचव रे ....."

नेहरु युवा केंद्र पुरस्कृत

## "मुली वाचवा अभियान" पुरस्कारासाठी प्रस्ताव

## वर्ष:- २०१२-२०१३

# आुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील |
| --- | --- |
| ०१ | प्रास्ताविक |
| ०२ | पुरस्कारासाठीची माहिती |
| ०४ | मागील वर्षातील विशेष श्रमसंस्कार शिबीराची माहिती |
| ०५ | विशेष उल्लेखाीय कार्य |
| ०६ | छायाचित्रे |
| ०७ | बातम्यांचे कात्रणे |
| ०८ | प्रमाणपत्रे व प्रशंसापत्रे |
| ०९ | कार्यक्रम अधिकाऱ्याची व्याख्याने व विविध लेखांची प्रतिानिधीक माहिती |

# प्रस्ताावना

रयत शिक्षण संस्था ही सन १९१९ या वर्षापासून शिक्षण क्षेत्रात सर्मपित भावनेने कार्यरत आहे. रयत शिक्षण संस्था ही भारतातीलच नव्हे तर अशिया खंडातील सर्वात मोठी संस्था म्हणून ओळखली जाते याच संस्थेमार्फत चालविले जाणारे लक्ष्मीबाई भाउराव पाटील महिला महाविद्यालय हे केवळ सोलापूर शहरातील उपेक्षित, वंचित, बंद पडलेल्या मिल कामगारांच्या मुलींसाठी म्हणून १९८९ पासून '**स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद**' या ध्येयाने काम करीत आहे. महाविद्यालयाच्या स्थापने नंतर सन १९९१ पासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत आहे. महाविद्यालयाने शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात जसा आपल्या कार्याचा ठसा उमठविला आहे, तसाच तो सामाजिक कार्यातही उमटविला आहे. महाविद्यालयाचा रा.से.यो. विभाग हा समाजसेवेची व राष्ट्रप्रेमाची भावना सतत विद्यार्थ्यांमध्ये जोपासत आला आहे.

**"स्त्रीदाक्षिण्य"** या उक्तीप्रमाणे आमच्या **महाविद्यालयाची स्थानिक व्यवस्थापन समिती** ही शहरातील विविध क्षेत्रातील नामांकित महिलांची आहे ज्यांना पाहून निश्चीतच एखाद्याला मुलीला जन्माला घालताना वाईट वाटणार नाही व असा विश्वास निर्माण होईल कि स्त्रियासुध्दा पुरुषांइतक्याच कार्यक्षम व सबल आहेत. **या समितीमध्ये मा. डॉ.सुहासिनी शहा, चेअरमन, (प्रिसीजन उद्योग समूह), सौ.सीमा किणीकर, निरामय अरोग्य धाम (एड्स नियंत्रण) सौ. तेजल जेऊरकर, (अश्वथ कम्प्युटर्स), सौ. स्नेहा सावे,(व्यवस्थापन व अभियांत्रिकी), डॉ.प्रियदर्शिनी कादे, (स्त्रीरोगतज्ञ) सौ.उल्काताई पाटील (सामाजिक व शैक्षणिक) इ. चा सक्रिय सहभाग आहे.** आमचे महाविद्यालय हे एक समाजपरिवर्तनाचे केंद्र असावे व आपण या समाजाचे कांही तरी देणे लागतो व आपले काही तरी उत्तरदायित्व आहे असे समजून इथे विद्यार्थी घडविण्याचे काम केले जाते. एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते ती म्हणजे भारतातील असा एकमेव राष्ट्रीय बालकामगार पुनवर्सन प्रकल्प आमच्या महाविद्यालयाकडून चालविला जातो. त्याला नुकतीच महाराष्ट्राचे **राज्यपाल महामहीम के. शंकरनारायणन** यांनी भेट देऊन गौरवोद्‌गार काढले. यामध्ये प्रामुख्याने बालकामगार मुलींचे पुनर्वसन केले जात आहे.

महाविद्यालयाने नॅक, बँगलोर, या संस्थेकडून पुनर्मूल्यांकन नुकतेच करुन घेतले असून. त्या समितीनेही त्यांच्या अहवालात महाविद्यालय राबवित असलेल्या सर्व उपक्रमांचे खास कौतुक केले आहे कि, विद्यार्थिनीना सबळ व स्वावलंबी करण्यासाठी येथे पुरेपुर प्रयत्न केले जात आहेत. त्याचबरोबर महाविद्यालयाला आंतरराष्ट्रीय दर्जाचे ISO - 9001-2008 हे मानांकन ही प्राप्त झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण उन्नतीकरिता हे महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते. श्रमदानाने महाविद्यालय परिसर स्वच्छ ठेवणे, वृक्षारोपणाने परिसर हिरवाईने नटविणे, रक्तदानातून सामाजिक बांधिलकी जपणे, रेड रिबन क्लब, यासारखे अनेक उपक्रम महाविद्यालय राबवित आहे. अतिशय कौशल्याने विद्यार्थ्यांना प्रेरीत करून महाविद्यालयाने दत्तक खेड्यात काम केले आहे त्याचे कौतूक मा. जिल्हाधिकारी डॉ जगदीश पाटील, मा. गोकुळ मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मोहन ठोंबरे, मा. तुकाराम कासार, विद्यमान जिल्हाधिकारी मा. डॉ. प्रविण गेडाम साहेब, मा. श्री बोने साहेब, उपमुख्य कार्यकारी अधिकरी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरूण देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते, संस्थेच्या मध्य विभगाचे चेअरमन मा. संजीव पाटील, मा भाई एस एम पाटील, मा. अण्णासाहेब पाटील, ज्येष्ठ समाजसेवक श्री पन्नालाल सुराणा, हॅलो मेडिकल फाउडेशनचे डॉ. शशिकांत व सौ शुभांगी अहंकारी यासारख्या अनेकांनी केले आहे. दत्तक खेड्यात शौचालयाच्या उभारणीपासून ते गोदूताई परुळेकर विडी कामगार वसाहतीमध्ये गर्भवतीमातांना प्रबोधनापर्यंत विविध कामे स्वयंसेवकांनी केली आहेत. तसेच महिला महाविदयालयाच्या स्वयंसेविका म्हणून काही मर्यादा असताना सुध्दा शारिरीक कष्टाची कामे असो प्रत्येक कार्यात हातभार लावला आहे. याचबरोबर विदयापीठाला नुकत्याच मिळालेल्या ५०० एकर जमिनीवर १ लक्ष वृक्षलागवडीच्या स्वप्नपूर्तीसाठी महाविदयालयांच्या स्वयंसेविकानी ३२ हजार वृक्षरोप तयार करण्याचे बहुमोल कार्य केले आहे. त्याचबरोबर महाविदयालयाने आंतरराष्ट्री ख्याती असलेल्या व अरोग्य क्षेत्रात काम करणा-या **हॅलो मेडिकल फांउडेशन** बरोबर **सांमजस्य करार** (MoU) केला आहे. रा. से. यो. ची ध्येये इतकी खोलवर रूजली आहेत, की त्यामुळेच अपघातग्रस्तांचे प्राण वाचविणे असो की, पुरग्रस्तांच्या मदतीत धावून जाणे असो ही कामे अतिशय तत्परतेने या विभागाने केली आहेत.

तसेच महाविद्यालयाच्या स्थापनेपासुन सातत्याने नेहरु युवा केंद्र, सोलापूर यांच्यावतीने महाविद्यालयात व शिबीरस्थळी विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात. ज्या नेहरु युवा केंद्राचा मुख्य उद्येश हा ग्रामीण व निमशहरी भागातील तरुण वर्गाला सशक्त व कर्तबगार बनविणे तसेच देशातील समस्यांकडे चिकित्सकपणे कसे बघावे हे शिकविले जाते त्या तरुणाईसोबत आमच्या महाविद्यालयाने विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत.

ज्या देशामध्ये, '**आताच ५०० रुपये खर्च करा आणि पुढचे लाखो रुपये वाचवा**', एका वर्तमानपत्रातील बातमीचा मथळा व '**परळी वैजनाथ येथे नाल्यात नऊ स्त्रीअर्भके सापडली**', गर्भलिंग निदान करणा-या रुग्णालयांवर धाड मारुन यंत्र जप्त करण्यात आल्याची बातमी, आजही मुलींचे गर्भ फेकून दिल्याच्या बातम्या बघायला व वाचायला मिळतात व नुकतीच प्रकाशित झालेली २०११ च्या जनगणनेची आकडेवारी हे आपली चिंता वाढविणारे विषय आहेत. स्त्रीभ्रूण हत्या आणि त्यामागील मानसिकता हा एक

सामाजिक रोग आहे. आता या रोगाचा प्रदुर्भाव ग्रामीण, शहरी, श्रीमंत, गरीब, विकसित, अविकसित अशा सर्व भेदांना ओलांडून होत आहे. यामुळे "मुली वाचवा अभियान" ही एक चळवळ होणे गरजेचे आहे असे वाटते. म्हणून आमच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवातच **"मुली वाचवा अभियान"** पर पथनाटयाने "बागले वस्ती व मिलिंद नगर" परिसरातून झाली. या प्रश्नाची व्यापकता लक्षात घेता महाविद्यालयात पोस्टर व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या तसेच विविध छायाचित्रासह काही ध्वनी व चित्रफितीही WWW.YOUTUBE.COM, WWW.TWITTER.COM, WWW.FACEBOOK.COM या वेबसाईटवर टाकण्यात आल्या आहेत. तसेच " स्त्रीदाक्षिण्य" या उक्तीप्रमाणे आमच्या महावद्यालयाची स्थानिक व्यवस्थापन समिती ही शहरातील विविध क्षेत्रातील नामांकित महिला आहेत ज्यांना पाहून निश्चीतच एखाद्याला मुलीला जन्माला घालताना वाईट वाटणार नाही. या समितीमध्ये मा. डॉ.सुहासिनी शहा, सौ.सीमा किणीकर, सौ. तेजल जेऊरकर, सौ. स्नेहा सावे, डॉ.पिय्रदर्शिनी कादे, सौ.उल्काताई पाटील इ. चा सक्रिय सहभाग आहे. . महाविद्यालय राबवित असलेला गर्भवती माता व नवजात बालक हा प्रकल्प **UNESCO - EIU - BEST PRACTICES - EDUCATIONAL PROGRAMMES IMPLEMENTED AT SOCIETY LEVEL - 2013** यासाठी पाठण्यित आला आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या सूचनेनुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजीव बावधनकर, उपप्राचार्य उत्तमराव हुंडेकर, राजेंद्रसिंह लोखंडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व समन्वयक प्रा.संतोष राजगुरु, प्रा. सुमन केंद्रे, मनिषा टांक, धनश्री तुपकर व विद्यापीठ प्रतिनिधी कु.पूजा सुपाते यांच्या उपस्थित स्त्री-पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी **जागर जाणीवांचा अभियान** यावर चर्चा करण्यात आली व विद्यार्थिनींकडून यासंबंधी सूचना मागविण्यात आल्या व त्यासाठी छापील नमुना तयार करण्यात आला. तसेच जिल्हास्तरीय निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्त्री-पुरष समानतेविषयक घोषवाक्ये स्पर्धा, परिसंवाद व पथनाटय बसवून जनमानसात जागृती निर्माण करण्यात आली व भव्य रॅली काढून समाजात याविषयाचे महत्व पटवून देण्याचे ठरविण्यात आले. व यामध्ये स्त्री-भ्रूण हत्या व मुलींचे गर्भातच हत्या रोखण्यासाठी जागृती निर्माण करण्यात आली.

तरी या महाविद्यालयाने आजवर केलेल्या कार्याचा विचार करून व कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष राजगुरु यांचे या विभागास असलेले योगदान पाहून **"मुली वाचवा अभियान"** योजना पुरस्कारांकरिता हा प्रस्ताव सादर करीत आहोत.

# मा. प्राचार्यांचे मनोगत

स्त्रीभ्रूण हत्या आणि त्यामागील मानसिकता हा एक सामाजिक रोग आहे. या रोगाचा प्रदुर्भाव ग्रामीण, शहरी, श्रीमंत, गरीब, विकसित, अविकसित अशा सर्व भेदांना ओलांडून होत आहे. हे सगळं पाहून माझ्यासारख्या महिला महाविद्यालयात काम करणा-या प्राचार्याला अस्वस्थ वाटायला लागते व याचे मूळ कारण म्हणजे समाजात असणारी स्त्रीकडे बघण्याची प्रवृत्ती सकारात्मक व्हावी व महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात म्हणून महाविद्यालय सतत प्रयत्नशिल आहे. रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात काम करत असताना ज्ञानाबरोबरच सामाजिक जाणीवा प्रगल्भ करण्याची शिदोरी आपसूकच मिळते व हे सर्व करताना हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर या संस्थेचा **'शुअर स्टार्ट'** प्रकल्पा, **नेहरु युवा केंद्र व जिल्हा नियोजन समितीचा "लेक वाचवा अभियान",** महाराष्ट्र शासनाचा **"निर्मल ग्राम कार्यक्रम"** व आता स्त्री पुरुष समानतेची बीजे रुजण्यासाठीचा "जागर जाणीवांचा" अशा अनेकविध उपक्रमात आमच्या महाविद्यालयास सहभागी होता आले हे मी माझे भाग्य समजतो. या सर्व उपक्रमांचा प्राथमिक उद्येशच हा आहे कि, माझी विद्यार्थिनी सक्षम झली पाहिजे. **"गर्भवती माता व नवजात बालक"**(MNH), आणि 'गर्भलिंग निदान करण्यापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी त्यांना बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबी करणे' याचाच एक भाग म्हणून गर्भलिंग निदान व निवड विरोधी अभियान हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी रितसर परस्पर सांमजस्य(MoU) करार करण्यात आला आहे. तसेच स्त्री पुरुष समानतेसाठी **"समजदार जोडीदार"** या (Gender Equality) प्रकल्पात सहभाग नोंदविण्यात येणार आहे.

आज परिस्थिती अशी झाली आहे कि, एकूण शिक्षणाचे वाढलेले प्रमाण, वाढती महागाई, व इतर अनेक कारणांमुळे लोकांना विशेष करुन मध्यमवर्गाला लहान कुटुंबाचं महत्व पटलेलं आहे आणि त्यामुळे लहान कुटुंब पण मुलगा हवा अशी परिस्थिती उद्भवलेली आहे. कित्येक कुटुंबं एका मुलावरच थांबताहेत. पहिली मुलगी झालेल्या शक्यतो ९५ टक्के जोडप्यांना दुस-यांदा मुलगाच हवा असतो. एक मुलगा आणि एक मुलगी असली की कुटुंब पूर्ण असल्यासारखे वाटतं. असं साधारणपणे मत असतं. पुरूषांना खरे तर त्यांचा नाव चालवणारा वारस हवा असतो. पहिली मुलगी असेल तरच दुसरं मुल होऊ द्यायच आणि तो मुलगा असावा म्हणून गर्भलिंग-निदान करुन घेऊन आवश्यक ती कारवाई करायची. मुलीचा गर्भ असेल तर तो पाडला जाणार हे निश्चित. असा एकूण आजचा प्रघात झालेला आहे. सरकारने कितीही कठोर कायदे केलेले असले तरीही छुप्या पध्दतीने हे सगळे केले जाते. लिंगगुणोत्तरात आलेली घट ही फक्त मुलग्याच्या हव्यासा पोटी नसून मुलींना झिडकारण्याच्या वृत्तीतूनही आलेली आहे. यामागे बरीच सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कारणे आहेत, ज्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येतील अशा

गोष्टी म्हणजे उद्योग-उदिमाचा अभाव, वाढत चाललेला हुंडा, पोटाची खळगी भरण्याची ददांत, एकंदरीतच बोकाळत चाललेला स्त्रियांवरचा अत्याचार या सगळयाला तोंड देताना बायकांचा जीव मेटाकुटीला येत असेल. **"बाईचा जन्म नकोच"** अशी मानसिकता बनत असेल का? भारतीय समाज हा पुरुषप्रधान असल्याने स्त्रियांनी कितीही कार्यकर्तृत्व सिध्द केले तरी म्हणावी तेवढी दखल घेतली जात नाही. ही असमानता स्त्री पुरुषांच्या नाकारलेल्या अधिकारातून येते. घरातील ठरावीक कामे मुलींनीच केली पाहिजेत, बाहेर जाताना भाऊ, आई किंवा बाब यांना सोबत घेऊनच जाणे हे प्रकार कुठेतरी कमी झाले पाहिजेत. यासाठी माझ्या महाविद्यालयातील प्रत्येक मुलगी सजग व सक्षम करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्यासाठी "जागर जाणीवांचा अभियान" **व "मुली वाचवा अभियान"** निश्चितच उपयुक्त ठरेल अशी मला खात्री वाटते. यासाठी मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन व आभार व्यक्त करतो.

महाविद्यालय हे समाजपरिवर्तनाचे केंद्र झाले पाहिजे असे माझे ठाम मत आहे व मुलींचा सर्वांगिण विकास व्हावा या अनुषंगाने आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये मूल्य शिक्षण, जीवन कौशल्ये व संवाद कौशल्ये, नवीन तंत्रज्ञान व आर्थिक दृष्टया निर्भर होण्यासाठी ब्युटी पार्लर, स्पोकन इंग्लीश, मूलभूत शिवणकाम व शिलाई मशीन कोर्स, बालवाडी शिक्षिकी कोर्स, भरतीपूर्व महिला पोलीस प्रशिक्षण केंद्र, तसेच मेहंदी, कातरकाम, प्लायवूड मेकिंग, जर्दोजी, पेपर क्वीलींग, भेटकार्ड बनविणे इ. साठी कामिनी गांधी संस्थेशी परस्पर सामंजस्य करारही करण्यात आला आहे. महाविद्यालयाचा विशेष उपक्रम म्हणजे ब-याचशा विद्यार्थीनी हया उपेक्षित, वंचित, बंद पडलेल्या मिल कामगारांच्या व बहुजन समाजातल्या मुली असल्याने त्यांना तत्रज्ञानात मागे असल्याचे जाणवते म्हणून महाविद्यालयाने सर्व विद्यार्थीनीचे ई-मेल व इंटरनेटचा कसा वापर करावा या निमित्ताने करुन घेतले आहे.

या सगळया कार्यक्षम व महिला सक्षमीकरणासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची दखल घेत राष्ट्रीय पातळीवरील NAAC या संस्थेने महाविद्यालयास **"A"** दर्जा देऊन गौरविलेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे "ISO 9001:2008" मानांकन महाविद्यालयास प्राप्त झाले आहे.

**प्राचार्य डॉ. राजीव बावधनकर**

# नेहरु युवा केंद्र पुरस्कृत "*<u>मुली वाचवा अभियान</u>*" संबंधी कार्यक्रमांचा अहवाल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **विद्यापीठाचे नांव** | : | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.<br>सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,<br>सोलापूर. ४१३ २५५ |
| २. | **महाविद्यालयाचे नांव** | : | रयत शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सम्राट चौक, सोलापूर. ४१३ ००२ |
| ३. | **प्राचार्यांचे नाव** | : | प्राचार्य डॉ.राजीव बजरंग बावधनकर |
| ४. | **कार्यक्रम अधिकाऱ्यांचे नांव,**<br>**निवासी पत्ता, दूरध्वनी क्रमांक** | : | प्रा. संतोष पुंडलिक राजगुरू<br>"परशुराम" ५६, अयोध्या नगरी, दहिटणे,<br>हैद्राबाद रोड, सोलापूर.<br>मो.नं. ९८२२८७०७४२ |
| ५. | **रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी**<br>**म्हणून सेवाकाल** | : | शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून आजतागायत |

## ६. कार्यक्रम अधिकाऱ्याचा सर्वसाधारण दृष्टीकोनः

स्वातंत्र्यपूर्व काळात आपले जीवन समर्पित करून समाजाच्या उध्दाराकरिता कार्य करणाऱ्या समाजसुधारकांनी भारतीय समाजास अंधःकार युगातून बाहेर काढून विज्ञानयुगात आणले. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडात उदयोन्मुख पिढीस समाजसेवेचे धडे विद्यार्थीदशेतच द्यावेत व युवाशक्ती राष्ट्रकार्यार्थ कामी आणावी म्हणून पंडित नेहरूंच्या विचारातून राष्ट्रीय सेवा योजा जन्मास आली. परंतु लवकरच ही केवळ योजना राहिली नाही, तर ती एक समाज कार्याची चळवळ बनली. रा.से.यो मुळे विद्यार्थ्यांना भारतीय समाजाची खरी ओळख झाली आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण झाला. हा विज्ञाननिष्ठ तरूण समाजातील अनिष्ट प्रथंविरोधात उभा राहिला. युवाशक्ती हाच देशाचा खरा आधार आहे. युवक हा उर्जेचा प्रचंड स्त्रोत आहे. त्यास विधायक वळण दिल्यास भारत जगात मानाचे स्थान मिळवेल. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी समर्थ भारताचे जे स्वप्न पाहिले आहे ते २०२० पर्यंत साकार करावयाचे असेल तर युवाशक्तीस संघटित करून त्याचा विधायक कामाकरिता वापर केला पाहिजे. त्यांच्यात श्रमप्रतिष्ठा निर्माण केला पाहिजे कारण श्रम ही नाशवंत गोष्ट आहे. आपण आज जर आपल्यातील उर्जेचा वापर केला नाही. तर ती उद्या साठवून वापरता येणार नाही. म्हणून श्रमाची लाज न बाळगता कोणतेही काम करण्याची वृत्ती अंगी बाळगवी पाहिजे.

भारतीय समाज हा अनेक जाती धर्मांनी बनला आहे. त्यांच्यातील वैमनस्य ही भारतापुढील एक मोठी समस्या आहे. आपण युवकांमध्ये सामाजिक सलोखा निर्माण केल्यास या प्रश्नाची तीव्रता कमी होण्यास मदत होईल. ग्रामीण भागात अंधःश्रध्दा मोठ्या प्रमाणावर आहे. परंपरागत शेतीमुळे शेतकरी कर्जबाजारी आहे. स्त्रियांच्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते आहे. बालविवाह, निरक्षरता, गर्भलिंग निदानामुळे गर्भातच स्त्री भृणहत्या, एड्स यासारख्या अनेक समस्या ज्या गावोगावी आपणास आढळतात त्यांच्या परिहारासाठी नियोजनबध्द प्रयत्न गरजेचे आहे. लोकसंख्या नियंत्रण, वृक्षारोपण, आधुनिक शेती याविषयी गावकऱ्यांचे प्रबोधन करून ग्रामोन्नतीकरिता आपण कटिबध्द राहिले पाहिजे. तरच महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत अवतीर्ण होईल. बकाल होणारी, ओस पडू लागलेली खेडी पुन्हा आनंदाने नाचू गाऊ लागतील.

- **राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून मुली वाचवा अभियान विषयी प्रबोधनपर उपक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये समाजसेवेचे भान निर्माण करणारी एक चळवळ आहे. आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने युवकांमध्ये स्त्री-भ्रूण हत्येविषयी तसेच गर्भलिंग निदान चाचणी विषयक जाणीव जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने ५० विद्यार्थ्यांचा ॲक्शन ग्रुप स्थापन करण्यात आला. 'हॅलो मेडिकल फाउंडेशन ' या अणदूर येथील संस्थेच सहकार्याने या ५० विद्यार्थ्यांची चार दिवसांची कार्यशाळा घेण्यत आली. त्यात लैंगिक शिक्षण,स्त्री शरीराची ओळख, त्यासंदर्भात असणारे गैरसमज, कायदे इ. संबंधी शास्त्रोक्त माहिती कृतीयुक्त पध्दतीने देण्यात आली. सोलापूर जिल्ह्यातील पाच महाविद्यालयांमधील रेड रिबन क्लबच्या स्वयंसेवाकांची एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करून संवाद कौशल्य, पथनाट्य कौशल्य व लेखन कौशल्य आदी विषयांवर तज्ज्ञांमार्फत त्यांचे प्रबोधन करण्यात आले. त्यानंतर रेड रिबन क्लबच्यावतीने विद्यार्थ्यांमध्ये एड्स विषयक व स्त्री भ्रूण हत्ये विरोधी जाणीव जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने शलाका हे भित्तीपत्रक चालविण्यात येऊ लागले. प्रशिक्षित स्वयंसेवकांच्यामार्फत महाविद्यालयीन तरूण व झोपडपट्टीत राहणाऱ्या तसेच खेडेगावातील जनतेत याविषयी जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने पथनाट्यांचे सादरीकरण केले गेले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एड्सविषयक व गर्भलिंग निदान विरोधी जागृती घडवून आणण्यास भरीव मदत मिळाली. विद्यार्थ्यांचा तज्ज्ञांशी व्याख्यानाच्या माध्यमातून संवाद साधला गेल्याने विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न दूर होण्यास निश्चित मदत झाली.

- **महिला बचत गटांची स्थापना : हॅलो मेडिकल फाउंडेशन च्या वतीने " गर्भवती माता व नवजात बालक " या प्रकल्पात काम करत असताना असे लक्षात आले कि, महिलाना आर्थिकदृष्टया सक्षम करणे देखील तितकेच महत्वाचे आहे. म्हणून परिसरातील वस्त्यांमध्ये जवळजवळ ७६ महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली.**

- राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यामार्फत मागील दोन वर्षात स्थायी स्वरुपाची जी कामे केली गेली. त्यामध्ये प्रामुख्याने ज्या गोष्टीचा उल्लेख करता येईल अशी बाब म्हणजे अणदूर येथील हॅलो मेडिकल फाउंडेशन बरोबर आमच्या महाविद्यालयाचा परस्पर सांमजस्य करार (MoU) झाला आहे. या संस्थेला अमेरिकोस्थित "PATH" या स्वयंसेवी संस्थेचे सहकार्य लाभले आहे. या माध्यमातून सोलापूर शहरातील ७८ वस्त्यांचा समावेश करण्यात आला असून परिसरातील महिलांचे मासिक पाळी सर्वेक्षण करुन पात्र गर्भवती मातांना प्रबोधन करणे, शासकीय योजनांची माहिती सांगणे, दवाखान्यातच बाळंतपण करणे किती गरजेचे आहे हे प्रत्येक वस्तीपातळीवरील महिलांना पटवून दिले आहे. नेहरु युवा केंद्र, सोलापूर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, सोलापूर

जिल्हा परिषद व आमच्या महाविद्यालयाच्या वतीने **"मुली वाचवा" व "गर्भलिंग निदान व निवड विरोधी अभियान"** हाती घेण्यात आले आहे. त्यामध्ये महाविद्यालयाने प्रत्येक रॅलीमध्ये सहभाग नोंदविला असून स्वत: महाविद्यालयाने वस्तीपातळीवर आयोजित केलेल्या रॅली व पथनाटय इ. माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे.

- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याच्यासंबंधी जागृती घडवून आणावी याकरिता विविध तज्ञ डॉक्टरांची व्याख्याने आयोजित केली जातात. प्रतिवर्षी रक्तदान शिबीरे आयोजित करून विद्यार्थ्यांना रक्तदानास प्रेरीत केले जाते. सर्वाधिक रक्तदान करणारे महाविद्यालय म्हणून आमच्या महाविद्यालयास गौरविण्यातही आले आहे.

ग्रामीण भागातील स्त्रियांना अनेक प्रकारचे प्रश्न सतावत असतात. त्यांच्या आरोग्याची हेळसांड केली जाते. त्यातच त आर्थिकदृष्टया परावलंबी असल्याने त्यांच्या दु:खात आणखी भर पडते. स्त्रियांची परिस्थिती सुधारावी याकरिता डॉ. विरबाला पारिख यांच्या सारख्या तज्ञ स्त्री डॉक्टरांचे मार्गदर्शन देण्याबरोबर त्या आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण व्हाव्यात म्हणून जे प्रयत्न आम्ही केले त्यास यश येऊन मौजे राळेरास येथे १३ बचत गट स्थापन झाले आहेत. स्त्रियांच्या आर्थिक उन्नतीतील एक टप्पा आम्ही गाठला आहे.

## मागील वर्षातील प्रकल्प

**महाविद्यालयातील प्रकल्प :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यामार्फत मागील दोन वर्षात स्थायी स्वरुपाची जी कामे केली गेली. त्यात महाविद्यालय परिसर व दत्तक खेडे अशा दोन विभागत करावी लागेल. महाविद्यालय परिसरात प्रमुख्याने एड्स प्रबोधनाच्या संबंधी रेड रिबन क्लबच्या माध्यमातून व्याख्याने, वक्तृत्व तसेच निबंध स्पर्धा व भिती पत्रक, पथनाट्याच्या माध्यमातून एड्स विषयक प्रबोधनाचे व जाणीव जागृतीचे कार्य मोठ्या प्रभाविपणे करण्यात आले आहे. याकरिता अणदूर येथील हॅलो मेडिकल फाउंडेशन बरोबर आमच्या महाविद्यालयाचा परस्पर सांमजस्य करार झाला आहे. या संस्थेला अमेरिकोस्थित "PATH" या स्वयंसेवी संस्थेचे सहकार्य लाभले आहे. या माध्यमातून सोलापूर शहरातील ७८ वस्त्यांचा समावेश करण्यात आला असून परिसरातील महिलांचे मासिक पाळी सर्वेक्षण करुन पात्र गर्भवती मातांना प्रबोधन करणे, शासकीय योजनांची माहिती सांगणे, दवाखान्यातच बाळंतपण करणे किती गरजेचे आहे हे प्रत्येक वस्तीपातळीवरील महिलांना पटवून दिले आहे. नेहरु युवा केंद्र, सोलापूर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, सोलापूर जिल्हा परिषद व आमच्या

महाविद्यालयाच्या वतीने **"मुली वाचवा"** व **"गर्भलिंग निदान व निवड विरोधी अभियान"** हाती घेण्यात आले आहे.

तसेच महाविद्यालयात परिसर वृक्षराजींनी बहरलेला असावा याकरिता वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन याकरिता रा.से.यो. ने. केलेल्या प्रयत्नामुळेच आज महाविद्यालयाचा परिसर अतिशय रमणीय बनला आहे. क्रिडांगण हे कोणत्याही महाविद्यालयाच्या अभिमानाचे स्थान आहे, म्हणून महाविद्यालय क्रिडांगणाची निर्मिती, साफसफाई महाविद्यालयाची नियमित स्वच्छता रा. से. यो. विभाग करीत आहे. राजर्षी शाहू महाराज जयंतीच्या निमित्ताने प्रतिवर्षी सामाजिक न्याय दिनाच्या प्रबोधन रॅलीचे संयोजन तसेच एड्सविषयी जागृती घडवून आणण्यासाठी प्रबोधन फेरीचे आयोजन रा.से.यो. विभाग करतो.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याच्यासंबंधी जागृती घडवून आणावी याकरिता विविध तज्ञ डॉक्टरांची व्याख्याने आयोजित केली जातात. प्रतिवर्षी रक्तदान शिबीरे आयोजित करून विद्यार्थ्यांना रक्तदानास प्रेरीत केले जाते. सर्वाधिक रक्तदान करणारे महाविद्यालय म्हणून आमच्या महाविद्यालयास गौरविण्यातही आले आहे.

- **राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमास बळकटी आणण्यासाठी स्वयंसेवक व इतर स्थानिक विकास संस्थांना एकत्र घेऊन मागील तीन वर्षात केलेले "मुली वाचवा अभियान विषयक कार्य".**

'NOT ME BUT YOU' हे ब्रीद घेऊन काम करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेला आपली उद्दिष्ट्ये सफल करण्याकरिता महाविद्यालय व विद्यापीठावरच अवलंबून राहून चालत नाही, ज्या समाजाच्या उन्नतीकरिता, विधायक परिवर्तनाकरिता आपणास काम करावयाचे आहे, त्या मसाजाशी, त्यांच्या समस्यांशी भिडावे लागते. हे करताना अनेक शासकीय व निमशासकीय तसेच बिर शासकीय संस्थांचे साहाय्य घ्यावे लागते. बिना सहकार नाही उद्धार असे जे म्हटले जाते ते याचसाठी की मोठे काम साध्य करण्याकरिता ऐक्याची गरज असते. हे ऐक्य या माध्यमातून साध्य करण्याचा प्रयत्न करून समाजातील सज्जनशक्ती गठीत करून समाज सुधारणेचे कामी लावण्याचा प्रयत्न आमच्या रा.से.यो. युनिटने केला आहे. यातून विद्यार्थ्यांमध्येही सहकार्याची, सहजीवनाची भावना वाढीस लागण्यास नक्कीच मदत झाली आहे. तसेच या विविध शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यामुळे आम्हांस ईच्छित ध्येय प्राप्ती करणे सहज शक्य झाले. रा.से.यो. विभागाने खालील शासकीय व स्वयंसेवा संस्थांची मदत घेतली.

**रा.से.यो. उपक्रमात सहभागी शासकीय व बिगर शासकीय संस्था -**

- क्षेत्रीय प्रचार कार्यालय, सोलापूर.
- जिल्हा परिषद, सोलापूर.
- फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर.
- नेहरू युवा केंद्र, सोलापूर.
- छत्रपती शिवाजी सर्वोपचार रूग्णालय, रक्तपेढी, सोलापूर.
- सी.वाय. डी. ए. पुणे.
- अंधश्रध्दा निर्मूलन समिती, सोलापूर.
- निरामय आरोग्य धाम, सोलापूर.
- रोटरी क्लब, सोलापूर.
- समाज कल्याण विभाग, सोलापूर.

## विशेष उल्लेखनीय कार्य

१. सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालयाने **"मुली वाचवा अभियान विशेषांक"** प्रकाशित केला आहे व संपूर्ण महाराष्ट्रातील महाविद्यालयांना याचे वितरण करण्यात आले आहे.

२. विविध वस्त्यांमध्ये महिलांच्या सबलीकरणार्थ १३ बचत गटांची स्थापना केली.

३. मदत तेरेसा व्यसनमुक्ती केंद्राच्या मार्फत दत्तक खेड्यात व्यसनाधिनतेविरूध्द अखंड प्रबोधनाचे कार्य.

४. पंडित दिनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयाच्या सहकार्याने दंतारोग्याच्या संबंधाने गाव दत्तक घेऊन मोफत चिकित्सा व नाममात्र व नाममात्र दराने दंतोपचार वर्षभर केले.

५. दत्तक गावात वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धनासाठी वृक्ष दत्तक योजना राबवून वृक्ष संवर्धनाची जबाबदारी मुलांवर सोपविली.

६. सोलापूर शहरातील ९७ गलिच्छ वस्त्यांमध्ये जाऊन जवळजवळ ७६ बचत गट स्थापन केले आहेत. व तेथील गर्भवती मातांची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच मुली वाचवा अभियानांतर्गत संपूर्ण शहरात रॅली व डिजीटल बॅनर लावून प्रबोधनाचे कार्य

**रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर, लैंगिक शिक्षण उपक्रम :**

स्वयंसेवकांमध्ये समाजसेवेचे बीज रोवले जावे याकरिता प्रतिवर्शी रक्तदान शिबीरांचे आयोजन केले जाते. महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाचा सर्वाधिक रक्तदान करणारे महाविद्यालय म्हणून दमाणी रक्तपेढीमार्फत सन्मानचिन्ह देऊन गौवर करण्यात आला आहे. तसेच छ. शिवाजी सर्वोपचार रूग्णालयाच्यामार्फत विद्यार्थ्यांच्या मोफत रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजनही केले गेले.

मुलांना पौंगंडावस्थेतील शारिरीक व मानसिक बदलांची जाणीव व्हावी याकरिता ज्येष्ठ समाजसेविका डॉ. सीमा किणीकर यांचे स्लाईड शो सह वयात येताना या विषयावरील अत्यंत उपयुक्त मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन केले गेले.

**शहरातील विविध वस्त्यांमध्ये पथनाटय सादरीकरण व डिजीटल बोर्डद्वारे जनजागरण :**

प्रामुख्याने सोलापूरातील विविध वस्त्यांमध्ये जाऊन समाज मंदीर अथवा सार्वजनिक पाणी भरण्याच्या ठिकाणी ही पथनाटये सादर करण्यात आली तसेच बस स्टॅन्ड, सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर विद्यापीठ, मध्यवर्ती ठिकाणे तसेच शासकीय कार्यालयांसमोर डिजीटल बोर्ड लावून जनजागृती करण्याचा व जाणीवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महाविद्यालयीन विद्यार्थिनीना कायदेविषयक मार्गदर्शन मिळावे म्हणून ॲड.सरोजनी तमशेटटी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थिनींमध्ये मूल्य शिक्षण, जीवन कौशल्य विकास करणे व संवाद कौशल्य, नवीन तंत्रज्ञान, आर्थिकदृष्टया निर्भर होण्याकरिता प्रेरित करण्यासाठी महाविद्यालयाकडून विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. आमचे महाविद्यालय हे उपक्रमशील महाविद्यालय आहे. विद्यार्थिनी हया देशाच्या आदर्श नागरीक कशा बनतील यासाठी त्यांना विविध कार्यक्रमांतून, व्याख्यानातून, कार्यशाळांमधून, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक, क्रिडा व सामाजिक मूल्ये बिंबवण्याच्या प्रयत्न केला जातो. सोलापूरचे **पालकमंत्री मा.लक्ष्मणरावजी ढोबळे, जिल्हाधिकारी मा.गोकुळ मवारे, पोलिस आयुक्त मा. प्रदीप रासकर, पोलिस अधिक्षक मा. राजेश प्रधान व मा. प्रमोदजी हिंगे, नेहरु युवा केंद्र यांच्या उपस्थितीत "जीवन कौशल्य" कसे विकसित व आत्मसात करावीत याविषयी जिल्हास्तरीय मोहिमेची सुरुवात करण्यात आली.** रयत प्रज्ञा शोध प्रकल्पांर्गत साठी नियमित वर्ग घेतले जात असून त्याचे स्वतंत्र अहवाल उपलब्ध आहेत. संवाद कौशल्य व व्यक्तीमत्व विकास यासाठी मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात. महाविद्यालयात अद्ययावत अशी इंग्रजी संवाद

कौशल्यासाठी **"भाषा प्रयोगशाळा"** विकसित करण्यात आली आहे. नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी म्हणून मुलींना **"इंटरनेट कोर्स"**, **"TALLY"** हे कोर्स मोफत शिकविण्यात येतात. बीसीए विभागाने अमेरिकेतील **"Patson USA"** या नामांकित कंपनीबरोबर MoU करुन विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्टया सबल केले आहे. महाविद्यालयात पुष्कळ लघु कालावधीचे कोर्स उपलब्ध असून विद्यार्थिनींच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहेत. यामध्ये खालील कोर्स समाविष्ट आहेत.

- Spoken English Course - Basic Beauty Parlour Training Course
- Basic Tailoring Course - Competitive Exam. Guidance Centre
- Brahmi & Modi Script Cert. Course (Dept. of History)
- Computer Courses - Tally, Internet
- Basic Course in Chinese Language
- Flower Making - Paper Quelling
- Designer Enevelopes - Imitation Jewellery
- Jardoji Stitching - Paper Bags
- Plywood Making
- Womens Pre-recruitment Police Training Centre
- Banking Examination Guidance Centre (IBPS) with T.I.M.E. Institue.
- PHP Course with Patson USA Inc. America for Website Designing.
- Yoga and self defense
- **Rayat Talent search (Disha project)**

हे सर्व कोर्स प्रमाणपत्र स्वरुपात असून त्यासाठी व्यवस्थापने समितीकडून विशेष आर्थिक सहकार्य मिळते. ज्यामुळे हे कार्य अव्याहतपणे चालू आहे. म्हणूनच विद्यार्थिनी विविध क्षेत्रात नावारुपास येत आहेत.

# छायाचित्रे

# वृत्तपत्रातील कात्रणे

# प्रमाणपत्रे व प्रशंसापत्रे